# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी — ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा.क्र.तशिविकापु/विवि/आढावा बैठक/२०१९/ 1368 दिनांक :- 27 MAR 2019

प्रति,
संचालक /प्राचार्य,
सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित,आणि सर्व खाजगी /स्वयंअर्थसहाय्यित)
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/पदवी आणि पदविका संस्था/हॉटेल मॅनेजमेंन्ट/वास्तुशास्त्र
पुणे विभाग.

विषय :- आढावा बैठकीच्या अनुषंगाने आवश्यक माहिती सादर करणेबाबत..

संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र १६/आस्था/आढावा बैठक/२०१९/७६ दिनांक २०/०३/२०१९

तत्रशिक्षण संचालनालय, मुंबई येथे दिनांक ०२/०४/२०१९ रोजी, आयोजित केलेल्या, विभागीय संहसंचालकाच्या आढावा बैठकीसाठी आपल्या संस्थेची खाली नमुद केलेल्या मुद्दयांची माहिती दिनांक २७/०३/२०१९ पर्यंत सांयकाळी ०५:०० वाजेपर्यत या कार्यालयास DV-TTYogesh या font मध्ये ईमेल द्वारे प्राधान्याने सादर करण्यात यावी

१. NBA Accrediation संस्था वस्तुस्थिती अहवाल (Status Report)
२. उद्योगधंद्याबाबत संस्थांनी MOU केलेल्या बाबतची यादी अद्ययावत करणे.
३. संस्थामधील Teaching Learning Process ~~आयोजित~~ व्यवस्थित सुरु असल्याबाबत. आढावा.
४. शिक्षकांसाठी Industrial Training आयोजित करणेबाबत केलेले प्रयत्न.
५. संचालनालयाचे News Letter च्या अनुषंगिक माहिती व विशेष आयोजित उपक्रम
६. संशोधन वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न व प्रोत्सहानपर योजनांची विभागवार माहिती.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

# तंत्र शिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – ३०२३३४७६, २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २२६९०००७

Email : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


**बैठकीची सूचना**

**बैठक दिनांक :०२.०४.२०१९**

क्रमांक : १६/आस्था/आढावा बैठक/२०१९/ ७६

दिनांक : २०।३।१९

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय : विभागीय सहसंचालक आढावा बैठक - दिनांक ०२.०४.२०१९**

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, तंत्रशिक्षंण संचालनालयातील, विभागीय संहसचालकांची आढावा बैठक **दिनांक ०२.०४.२०१९रोजी सकाळी ११.००** वाजता सिडनेहॅम,चर्चगेट, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीस मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग हे उपस्थित राहणार आहेत.

सदर आढावा बैठकीबाबतचे मुद्दे खालील प्रमाणे देण्यात येत आहे. सदर नमूद मुद्दाच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाशी संबधित मुद्दाबाबतची माहिती / अभिप्रायात्मक टिप्पणी या कार्यालयास ईमेलव्दारे (soft copy) दिनांक २८.०३.२०१९ रोजी ५ वाजेपर्यंत सादर करावी व बैठकीच्या वेळी सोबत आणावी.

**बैठकीचे मुद्दे :**

१. दिनांक १३.१२.२०१८ रोजी संचालनालयात आयोजित करण्यांत आलेल्या आढावा बैठकीच्या इतिवृत्तामधील खालील नमूद सूचना / निर्देश यांना अनुसरून आपल्या कार्यालयाने संबंधित मुद्यांबाबत केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल

(i) NBA Accrediation च्या अनुषंगाने आपल्या विभागातील शासकीय व अनुदानित संस्थाबातच्या संस्थानिहाय वस्तुस्थिती अहवाल. (Status Report)

(ii) उद्योगधंद्यासोबत संस्थांनी MOU केलेल्या बाबतची यादी अद्ययावत करणेबाबत.

(iii) शासकीय संस्थांमधील Teaching Learning Process व्यवस्थित सुरू असल्याबाबतचा आढावा व Model Curriculum चे स्वायत्त संस्थामधील Implementation बाबतची सदयस्थिती

(iv) शिक्षकांसाठी Industrial Training आयोजित करणेबाबत केलेले प्रयत्न.व विदयार्थ्यांचे Implant Training बाबतची संस्थानिहाय माहिती

(v) सर्व शासकीय संस्थांचे व विभागीय कार्यालयाचे संकेतस्थळ अद्ययावत असण्याबाबतची कार्यवाही.

(vi) सर्व संस्था व विभागीय कार्यालयांचे संकेतस्थळावर Public Grievance System कार्यरत असण्याबाबतची कार्यवाही.

(vii) राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शासकीय संस्थांमधून वार्षिक दिनदर्शिकेनुसार घेण्यात येत असलेल्या कार्यक्रमाचा अद्ययावत तपशिल.

(viii) संचालनालयाचे News Letter च्या अनुषंगिक माहिती.

(ix) DBT Portal वरील विविध शिष्यवृत्ती योजनेचे प्रलंबित असलेल्या अर्जाबाबत.

(x) शासकीय संस्थांमध्ये सुरू असलेल्या व्दितीय पाळीतील अभ्यासक्रमाचे अनुषंगाने घेतलेल्या आढाव्याबाबत.

(xi) वृक्षलागवडीच्या अनुषंगाने दिलेले उद्दिष्टय व साध्य केलेले उद्दिष्टय.

२. विभागातील शासकीय संस्थामध्ये २०१८-२०१९ मधील निधीच्या अनुषंगाने बांधकामाबातची सदयस्थिती व बांधकामाबातचे पुढील वर्षातील नियोजन

३. संचालनायाकडून उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या अनुषंगाने ३१/०३/२०१९ रोजीच्या खर्चाचा आढावा

४. न्यायालयीन प्रकरणे / अवमान याचिका याबाबतची वर्षनिहाय / न्यायालय निहाय प्रकरणांची सद्यस्थिती (MAT/Hon. High Court/Hon. Supreme Court/ Affidavit Submitted/ not submitted) संचालनालयाकडून / शासनाकडून आवश्यक असलेल्या आदेश/ सुचना याबाबतची प्रकरणनिहाय माहिती.

५. विभागातील अनुदानित संस्थांच्या मूल्यनिर्धारणाची कार्यवाही व सद्यःस्थिती.

६. वृक्षलागवड उपक्रमा अंतर्गत आपल्या विभागाच्या स्तरावर करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा तपशिल.

७. सहसंचालकांनी त्यांच्या विभागाअंतर्गत असलेल्या शासकीय संस्थांना दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक अहवाल.

८. विभागातील शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संस्थांच्या N.B.A. बाबत सद्यस्थिती.

९. विभागीय कार्यालयाचे स्तरावर वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदभरती व पदोन्नती याबाबतच्या कार्यवाहीची सद्यस्थिती.

१०. संस्थांमध्ये संशोधन वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न व प्रोत्साहनपर योजनांची विभागनिहाय माहिती.

आपल्या विभागातील शासन स्तरावर प्रलंबीत असलेल्या विषयाबाबतची माहिती सुध्दा स्वतंत्रपणे सोबत आणावी. तसेच सदर बैठकीस आपण स्वतः संपूर्ण माहितीसह उपस्थित रहावे.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :**

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३. सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी. तसेच त्यांना कळविण्यात येते की, सदर विषय सूचीमध्ये आपल्या कार्यासनाशी संबंधित मुद्दयाबाबत आपली सविस्तर वस्तूस्थिती दर्शक अद्ययावत माहिती दिनांक २८.०३.२०१९ रोजी पर्यंत श्रीम. पेडणेकर, कार्यासन क्रमांक-१ यांच्याकडे सादर करावी व सदर माहिती श्रीम. पेडणेकर यांनी एकत्रित करून दिनांक २८.०३.२०१९ रोजी होणा-या बैठकीच्या अनुषंगाने मा.संचालकाच्या अवलोकनार्थ सादर करावी.